# व्याजदर आणि जोखमेची प्रतवारी याबाबतचा दृष्टीकोन

भारतीय रिजर्व बँकेच्या योग्य वर्तणुकीच्या नियमांनुसार असे अपेक्षित आहे की एनबीएफसी च्या संचालक मंडळाने बदलणारे व्याजदर आणि जोखीमेची प्रतवारी याबाबत एनबीएफसीचा दृष्टीकोन ग्राहकांसमोर मांडावा आणि त्यांच्या सार्वजनिक वेबसाईटवर प्रकाशित करावा.

प्रत्येक प्रकरणात ग्राहकांना उधार देणे, जोखीमेची प्रतवारी आणि ग्राहकांकडून आकारला जाणारा व्याजदर किंवा भाडे यांच्याबद्दल कंपनीचा निर्णय एक किंवा अनेक घटक लक्षात घेवून घेतला जातो, ज्यामध्ये पुढील घटक समाविष्ट आहेत: ग्राहकाची पार्श्वभूमी आणि परतफेड क्षमता, मागील परतफेडीचा इतिहास आणि ट्रॅक रेकॉर्ड, रोख रकमेचा प्रवाह आणि इतर आर्थिक जबाबदाऱ्या, उपलब्ध असलेले तारण आणि कसूर होण्याचा धोका, निधीची रक्कम, अर्थ-प्राप्तीचा कोणताही उपलब्ध मार्ग, व्याजासाठी अर्थसहाय्य किंवा सवलत, संचालन/प्रशासन याचा खर्च, सीमा आणि जोखीमेचा हफ्ता, उधार/कर्जाची मुदत किंवा कालावधी, ग्राहकाचे भौगोलिक स्थान, कंपनीची स्पर्धात्मक स्थिती, इत्यादी. वरील माहिती ग्राहकांनी दिलेली माहिती, धनादेश आणि केलेले प्रमाणीकरण, आणि इतर स्त्रोत किंवा क्रेडीट ब्युरो, इ. सारख्या स्वतंत्र तृतीय पक्षाकडून कंपनीने जमा केलेल्या माहितीच्या आधारावर जमा केली जाते. पत मूल्यांकन कंपनीच्या अंतर्गत पत धोरण आणि दृष्टिकोन यावर आधारित असेल.

प्रत्येक प्रकरणात, ग्राहकाला प्रदान करण्यात येणाऱ्या उधार करारनामा / संबधित दस्तावेज यांच्या स्वाक्षरीकृत प्रतीद्वारे ग्राहकास आकारण्यात येणारे वार्षिक व्याज दर/ भाडेपट्टी कळवले जातील. प्रत्येक प्रकरणात व्याजदर/ भाडेपट्टी ठरवण्याचा योग्य अधिकार व्यवस्थापनास आहे आणि प्रत्येक प्रकरणात तथ्ये आणि परिस्थितीनुसार व्याजदर/ भाडेपट्टी बदलू शकतात. म्हणून, दोन ग्राहकांनी एकाच वेळेस घेतलेल्या समान उत्पादन आणि मुदत/कालावधी साठी वेगवेगळे व्याजदर / भाडेपट्टी असू शकतात.

कर्जदारांना उपलब्ध असलेले आर्थिक उत्पादन आणि आर्थिक सेवा पुरवठादार यांचे आनुषंगिक पर्याय आणि कंपनीच्या निवडक बाजार क्षेत्रातील स्पर्धात्मक दबाव, कंपनीच्या ग्राहकांसाठी अत्याधिक व्याजदर/ भाडेपट्टीची मागणी करण्याविरुद्ध नैसर्गिकरीत्या सुरक्षा प्रदान करतात.

**अद्ययावत अपडेट**: खालील दिलेल्या समीक्षेच्या तारखेआधी जर हे दस्तावेज सुधारित केले गेले तर अद्ययावत आवृत्ती कंपनीच्या वेबसाईटवर प्रकाशित केली जाईल.

| | |
|---|---|
| तारीख: | १६ सप्टेंबर, २०२१ |
| बोर्डाची मंजुरी: | १६ सप्टेंबर, २०२१ |
| पुढील समीक्षेची तारीख: | १६ सप्टेंबर, २०२३ |
| दस्तावेजाचा मालक: | मान्यता |

Registered Office
De Lage Landen Financial Services India Pvt. Ltd.
CIN: U65900MH2011FTC221903
20/F, Peninsula Business Park, Tower A
Senapati Bapat Marg, Lower Parel
Mumbai 400 013
India

Telephone +91 22 2482 3199
www.dllgroup.com

DLL (De Lage Landen) has offices in more than 30 countries throughout Europe, North America, South America, Australia and Asia. The company is part of the Rabobank Group.